पुढारी MY कोल्हापूर रविवार, २० ऑक्टोबर २०२४

# विवेकानंद कॉलेजच्या १६१ विद्यार्थ्यांची निवड

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

विवेकानंद महाविद्यालयाच्या १६१ विद्यार्थ्यांची पुणे येथील नामांकित कंपनीत निवड झाली आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचा प्राचार्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. महाविद्यालयाच्या ट्रेनिंग व प्लेसमेंट सेल विभागाकडून एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. २०० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी ॲप्टिट्यूड व सॉफ्ट स्कीलचे प्रशिक्षण पूर्ण केले. त्यानंतर विद्यार्थ्यांचा टेलिफोनिक इंटरव्ह्यू घेण्यात आला. त्यातून संबंधित विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली.

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्रा. अभयकुमार साळुंखे, संस्थेच्या सचिवा प्राचार्या शुभांगी गावडे, मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

तरुण भारत संवाद
रविवार, २० ऑक्टोबर २०२४

# विवेकानंदच्या १६१ विद्यार्थ्यांची कंपनीत निवड

## विवेकानंद शिक्षण संस्थेकडून अभिनंदन

प्रतिनिधी
कोल्हापूर

विवेकानंद महाविद्यालय (अधिकारप्रदत्त स्वायत्त) कोल्हापूरच्या ट्रेनिंग व प्लेसमेंट सेल विभागाकडून जी. टी. टी. फौंडेशन, पुणे यांच्यामार्फत एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. ज्यामध्ये २०० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी NSDC Portal वर रजिस्ट्रेशन पूर्ण केले. त्यातील काही विद्यार्थ्यांनी अँप्टीटयूड व सॉफ्ट स्कीलचे प्रशिक्षण पूर्ण केले. त्यानंतर विद्यार्थ्यांचा टेलिफोनिक इंटरव्हयू घेण्यात आला. व त्यातून विश्रांतवाडी पुणे येथील EPIC Consulting Service या कंपनीमध्ये १६१ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली.

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्रा. अभयकुमार साळुंखे, संस्थेच्या सचिवा प्रा. शुभांगी गावडे, मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांनी अभिनंदन केले. या निवडीसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर आर कुंभार व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षचे प्रमुख डॉ. श्रुती जोशी यांचे बहुमोल सहकार्य लाभले.

या प्लेसमेंट ड्राईव्हचे यशस्वी नियोजन करण्यासाठी ट्रेनिंग व प्लेसमेंट सेलचे प्रमुख प्रा. सतीश चव्हाण व सदस्य प्रा. संजय थोरात, डॉ. संजय लट्ठे, डॉ. राजश्री पाटील, प्रा. विजय पुजारी, डॉ. अस्मिता तपासे, प्रा. पल्लवी देसाई, प्रा. राहुल इंगवले, प्रा व्ही. व्ही. मिसाळ, प्रा ए एल उपाध्ये, डॉ ए आर कासारकर यांनी विशेष परिश्रम घेतले. विवेकानंद कॉलेजचे रजिस्ट्रार आर. बी. जोग व प्रशासकीय कर्मचाऱ्यांचे मोलाचे सहकार्य लाभले.